# अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य मुंबई- ५१
# सर्वे क्र- ३४१, वांद्रे कुर्ला संकुल, रिझर्व्ह बँके समोर वांद्रे (पूर्व) मुंबई-५१
# करार तत्वावर पदभरती

अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य मुंबई-५१ तसेच सर्व विभागीय कार्यालयासाठी शासन निर्णय क्र. संकीर्ण -२७१५/प्र.क्र. १००/१३, दिनांक १७.१२. २०२१६ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे सेवानिवृत्त अधिकार व कर्मचाऱ्यांचा सेवा करार तत्वावर भरवायच्या असल्याने पात्र सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची आपले अर्ज सोबतच्या नमुन्यामध्ये या कार्यालयाचे उपरोक्त पत्यावर पाठवावेत. खालील नमूद पदांवर सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांची कंत्राटी पद्धतीने नेमणूक उपरोक्त शासन निर्णयाच्या अधीन राहून मुलाखतीद्वारे करण्यात येईल. अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख २७.०६.२०२५ राहील.

प्रशासनातील वरिष्ठ विधी अधिकारी-१ पद आणि विधी अधिकारी-०९ पदे सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ नुसार सेवानिवृत्त शासकिय /निमशासकिय अधिका-यांमधून करार पद्धतीने ११ महिन्याच्या कालावधीकरीता भरण्याबाबत मा. आयुक्त यांनी दि. ३०.०५.२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे.

मा. आयुक्त यांचे मान्यतेचे अनुषंगे वरिष्ठ विधी अधिकारी-१ पद आणि विधी अधिकारी-०९ पदे भरणेबाबत विस्तृत जाहिरात अन्न व औषध प्रशासनाच्या http://fda.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १३ जून, २०२५रोजी प्रसिध्द करण्यात येणार असून, इच्छुक उमेदवारांनी त्यांचे अर्ज विहित नमुन्यात आवश्यक प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह प्रशासनाच्या कार्यालयात दिनांक २७ जून, २०२५ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत कार्यालयात सादर करावे. वरिष्ठ विधी अधिकारी-१ पद आणि विधी अधिकारी-०९ पद हे खालील अटी आणि शर्तीच्या अधीन करण्यात येईल.

| पद | पद संख्या | पात्रता | आरक्षण | मानधन ( शासन निर्णय १७.१२. २०१६ अन्वये कमाल मर्यादा) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| २. वरिष्ठ विधी अधिकारी | १ | उमेदवार मान्यता प्रापत विद्यापीठाचा पदव्युत्तर पदवी धारण करणारा (एल.एल.एम) व सनद धारक असेल.<br>कायद्याच्या केसेस हाताळण्याच्या कामाचा पाच वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.<br>उमेदवारास अन्न व औषध विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी | खुले-१ | रुपये दरमहा ४०,०००/- किंवा सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक १७ डिसेंबर २०१६ मधील परिशिष्ट अ चे उदाहरणानुसार परिश्रमिक यापैकी जे कमी असेल ती |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | इत्यादी बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदे विषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. सरकारी/निमसरकारी कार्यालयात विधी सल्लागार म्हणून काम केलेले असल्यास प्राधान्य राहील. | | रक्कम देय राहील. |
| विधी अधिकारी (मुख्यालय, बृहन्मुंबई, ठाणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, पुणे, अमरावती) | ०९ | उमेदवार मान्यता प्रापत विद्यापीठाचा का यद्याची पदवी धारण करणारा (एल.एल.बी) व सनद धारक असेल. कायद्याच्या केसेस हाताळण्याच्या कामाचा तीन वर्षाचा अनुभव आवश्यक राहील. उमेदवारास अन्न व औषध विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादी बाबत ज्ञानसंपन असेल ज्यामुळे कायदे विषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. सरकारी/निमसरकारी कार्यालयात विधी सल्लागार म्हणून काम केलेले असल्यास प्राधान्य राहील. | खुले- ९ | रुपये दरमहा ३०,०००/- किंवा सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक १७ डिसेंबर २०१६ मधील परिशिष्ट अ चे उदाहरणानुसार परिश्रमिक यापैकी जे कमी असेल ती रक्कम देय राहील. |

उमेदवारांना अर्ज करण्यासाठी खालीलप्रमाणे अटी आणि शर्ती राहतील

१. आवश्यक प्रमाणपत्राच्या सत्याप्रतीसह अर्ज अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य मुंबई ४०००५१ या पत्त्यावर पाठवावे. मुलाखातीच्या वेळी प्रमाणपत्राच्या मूळ प्रती सादर करणे वधानकारक राहील. मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी व मुलाखतीचे वेळापत्रक प्रशासनाच्या वेबसाईट http://fda.maharashtra.gov.in वर प्रसिद्ध करण्यात येईल. वेळापत्रकानुसार पात्र उमेदवारांनी मूळ कागदपत्रांसह प्रशासनाच्या मुंबई येथील मुख्यालयात स्वखर्चाने मुलाखतीसाठी उपस्थित रहावे. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. इच्छुक उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळाला भेट देवून माहिती प्राप्त करून घ्यावी.

२. अर्ज पाठवित असताना पाकिटावर ज्या पदासाठी अर्ज केलेला आहे त्या पदाचे नाव लिहावे. जाहिरातीनुसार पदसंख्या कमी-जास्त करणे, त्यात काही बदल करणे, पुढे ढकलणे, अटी-शर्तीमध्ये बदल करणे, रद्द करणे इत्यादी अंतिम अधिकार आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

३. करार तत्वावरील नियुक्ती ११ महिन्यांसाठी राहील.

४. चुकीची माहिती, कागदपत्रे, दस्तऐवज देवून नियुक्ती झाल्याचे निदर्शनास आल्यास कायदेशीर कारवाई करून कोणत्याही क्षणी कोणत्याही टप्प्यावर नियुक्ती रद्द करण्यात येईल.

५. नेमणुकीकरिता अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६. करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

७. नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जवाबदारी संबंधित व्यक्तींची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र, त्यांच्याकडून घेण्यात येईल, समाधानकारक काम नसल्यास संबंधितांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

८. करार पद्धतीवरील अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे /माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

९. सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या विहित कार्यपद्धतीचे पालन करून करार पद्धतीने नेमणूक करताना त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी असलेल्या एकूण वेतनात (मूळ वेतन व महागाई भत्ता धरून) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्ती वेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृची वेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्राभिक म्हणून निश्चित करण्यात येईल तथापि सदर पारिश्रामिक रक्कम रुपये ३०,०००/- किंवा रुपये ४०,०००/- प्रतिमाह पेक्षा अधिक असणार नाही.

१०. करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमाक संकीर्ण २०१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक ०८/०१/२०१६ तसेच दिनांक २ मार्च २०१६ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

११. पात्र अर्जाची संख्या विचारात घेऊन योग्य निवड पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

सही/-

राजेश ज. नार्वेकर, भा. प्र. से.

आयुक्त

अन्न व औषध प्रशासन म. राज्य, मुंबई

उ) अर्जाचा नमुना खालील प्रमाणे निर्गमित करता येईल.

सेवानिवृत्त शासकीय/निमशासकीय अधिका-यांमधून करार पध्दतीने भरावयाच्या विधी अधिकारी पदासाठीच्या अर्जाचा नमुना,

१. अर्जदाराचे नांव-

२. सेवानिवृत्तीचा दिनांक
(सेवानिवृत्ती आदेशाची प्रत जोडावी)

३. अर्जदाराचा पत्ता-

४. दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक-

४. जन्म दिनांक व अर्जाच्या दिनांकास वय-

६. शैक्षणिक अर्हता-

७. एकूण अनुभव कालावधी

८. अनुभवाचा तपशिल

| अ.क्र. | कालावधी | काम केलेल्या विभागाचे नाव | पदनाम | वेतन ग्रेड पे सह | कामाचा तपशील | विशेष यश |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

प्रस्तुत करार पध्दतीने नियुक्ती बाबतच्या जाहिरातीतील सर्व बाबी मी काळजीपूर्वक वाचल्या असून सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण

दिनांक

(अर्जदाराचे नांव व सही दिनांकासहित)

उमेदवाराने ज्या विभागातील अनुभव नमुद केला आहे त्या विभागाने द्यावयाचे अनुभव प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री. श्रीमती ____________ हे ____________ या विभागात ____________ या पदावर कार्यरत होते / होत्या, त्यांना ______ वर्षे ______ महिन्याचा कायद्याच्या केसेस हाताळण्याच्या कामाचा अनुभव आहे.

सेवानिवृत्तीच्या दिनांक ----------- रोजी त्यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही.

(कार्यालय प्रमुखाचे नांव, पदनाम व कार्यालयाचा शिक्का)